# इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार योजना

मनीषा लवणकर
आचार्य पदवी विद्यार्थिनी (कृषि विस्तार शिक्षण विभाग)
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

प्रा. अक्षय ढेंगळे
सहाय्यक प्राध्यापक (कृषि विस्तार शिक्षण विभाग)
मारोतराव वादाफळे कृषि महाविद्यालय, यवतमाळ

बदलत्या काळाप्रमाणे शेतकरी आणि शेती पध्दतीमध्ये बदल करण्याच्या उद्देशाने सरकारने एक महत्वपूर्ण पाऊल उचलले आहे. पिकाच्या ऑनलाईन विक्रीसाठी देशभरात १४ एप्रिल २०१६ रोजी राष्ट्रीय कृषी बाजार योजनेअंतर्गत ई - मंडीचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. इंटरनेटच्या माध्यमातून देशातील विविध राज्यात असलेल्या कृषी उपज बाजार समितीच्या नावाखाली देशातील वेगवेगळ्या बाजार समित्या जोडल्या गेल्यात आहेत. संपूर्ण देश हा बाजारपेठ बनला पाहिजे, असे या योजनेचे लक्ष्य आहे. उदारणार्थ, महाराष्ट्रातील एखाद्या शेतकऱ्याला आपले उत्पादन दिल्लीत विकायचे असेल तर शेतीमाल घेऊन जाणे आणि त्याची विक्री करणे या ई-नाम योजनेमुळे सहज शक्य झाले आहे. याअंतर्गत शेतकरी कुठल्याही वस्तू योग्य किमतीवर नोंदणी करून विक्री करू शकतात. शेतकरी आणि खरेदीदार यांच्यामधील दलालाची मध्यस्थी ई-नाम या योजने मुळे संपुष्टात आलेली आहे. केवळ शेतकरीच नाही तर ग्राहकांना सुद्धा याचा लाभ मिळणार आहे.

## ई-नाम योजनेचा उद्देश काय आहे?

- देशातील सर्व बाजारमंडीना एकत्र करून शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या विक्रीसाठी "एक राष्ट्र एक बाजारपेठ" तयार करणे.
- शेतकऱ्यांना शेतमालाची योग्य किंमत प्राप्त करून देणे.
- ई-नाम योजनेमुळे शेतकरी व ग्राहक यांच्यामधील दलालांची मध्यस्थी कमी होण्यास मदत होते.
- इलेक्ट्रॉनिक राष्ट्रीय कृषी बाजार हा एक संयुक्त राज्यस्तरीय वितरण प्रणाली आहे या प्रकल्पाचा मुख्य उद्दीष्ट भारतातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीचे सुधारणा करणे हा आहे.

## ई-नाम योजनेमध्ये कोणाकोणाचा समावेश होतो?

योजनेमध्ये देशभरातील शेतकरी, शेतकरी संघटना आणि शेतकरी उत्पादक कंपन्या ह्या जुडल्या गेलेल्या आहेत. याच ॲपवर राष्ट्रीय कृषी बाजाराशी शेतकरी बांधव जुडले जाणार असून एकाच ठिकाणी सर्व सुविधांचा लाभ घेता येणार आहे. वाहतूक, हवामान अंदाज आणि फिन्टेक सेवा अशा खासगी संस्थांकडून दिल्या जाणाऱ्या सुविधा जोडण्याचे काम सध्या सुरू आहे. हे पूर्ण झाल्यानंतर ई-नामशी संलग्न शेतकऱ्यांना सर्व सुविधा एकाच ठिकाणी मिळू शकणार आहेत.

## ई-नाम मध्ये किती भाषांचा वापर केला जातो?

ई-नाम मध्ये एकुण १२ भाषांचा समावेश आहे. त्यामध्ये इंग्लिश, हिन्दी, गुजराती, मराठी, तेलगू, बंगला, तमिळ, ओरिया, पंजाबी, मल्यालम, कनाडा आणि डोगरि इत्यादी भाषांचा वापर होतो.

## ई-नाम सोबत शेतकरी कसे जोडले जातील?

ई-नाम सोबत शेतकऱ्यांना जोडण्यासाठी ई-नाम हे एक ॲप मोबाइलमध्ये डाउनलोड करून रजिस्ट्रेशन करावे लागेल किंवा enam.gov.in. या संकेतस्थळावर जाऊन तेथील सर्चबारमध्ये 'नोंदणी' करून लॉगिन करावे लागेल. लॉगिन केल्यानंतर सुरु होणाऱ्या डॅशबोर्डमध्ये त्यांना आपल्या कागदपत्रांची नोंदणी करु शकता. त्यानंतर शेतमालची क्वॉलिटि कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये असणाऱ्या प्रयोगशाळेमधून नमुने देऊन तपासून घ्यावे लागेल जेणेकरून शेतमालमध्ये पाण्याचे, प्रोटीन आणि तेलाचे प्रमाण आहे हे कळून येईल. कृषी उत्पन्न बाजार समितीकडून मान्यता मिळाली की, शेतकरी बांधव व्यवहार करण्यास सुरुवात करु शकतात.

## ई-नाम हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी कसा फायद्याचा ठरू शकेल?

'ई-नाम' हे ऑनलाईन पोर्टल देशभरातील शेतकरी, व्यापारी, खरेदीदार यांना एकत्र आणणारे आणि सर्वोत्तम भाव, योग्य बाजारपेठ मिळवून देणारे पोर्टल आहे. ई-नामच्या माध्यमातून, शेतकऱ्यांना उत्पादन विक्रीसाठी सुलभ व्यवस्था मिळते. त्यांना अनेक बाजारांमध्ये त्यांच्या उत्पादनांच्या भावांची नोंदणी करण्याची संधी मिळते. ई-नामच्या माध्यमातून उत्पादकांना त्यांच्या उत्पादनांचे निर्धारित भाव स्थायी असतात, ज्यामुळे भाव बदलण्याची समस्या कमी होते. या योजनेच्या माध्यमातून उत्पादकांना उत्पादनांचे भाव विविध बाजारांत तुलनेने तपासून घ्यावे लागत नाही. यामुळे समय आणि शुल्क सुद्धा बचत होतो. या योजनेमुळे शेतकऱ्यांना आपला माल कुठे विकावा, किती किमतीला विकावा हे ठरविण्याचा अधिकार मिळालेला आहे. शेतकऱ्यांना आता एकाच छताखाली सर्व सुविधा, बियाणांपासून बाजारपेठेपर्यंतची सर्व माहिती एकाच ॲपवर उपलब्ध होते. हा सर्व व्यवहार उत्पादक शेतकरी आणि थेट ग्राहकांमध्ये होत असल्यामुळे यात कोणत्या मध्यस्थांची गरज नसते. त्यामुळे कमी खर्चात आपला माल ग्राहकांकडे पोहचत असल्याने शेतकऱ्यांना अधिक नफा मिळत असतो. पोर्टलचा सर्वात महत्त्वाचा उद्देश म्हणजे, आपल्या स्थानिक शेतमालाला देशभरात पोहचवणे हा आहे. असे बरेच फायदे ई नाम या योजनेचे शेतकऱ्यांसाठी आहेत.

★ ★ ★ (संपर्क: +९१ )